नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

दिनांक 10/01/2022 (सोमवार)
(सायंकाळ)

---

## खून करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. कन्हान :– दिनांक 11/04/2017 चे 17.51 वा. दरम्यान फिर्यादी यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे अप. क्र. 100/2017 कलम 324, 504, 326, 302 भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक 11/04/2017 चे 13.00 वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. रेखा राधेश्याम पुरे, वय 38 वर्ष, रा. नांदगाव एसबा हिची सासु/मृतक नामे– श्रीमती नर्मदाबाई शामराव पुरे, वय 70 वर्ष, रा. नांदगाव हि आपल्या घरा समोर उभी असतांना आरोपी नामे– पृथ्वीराज इेवचंद चौव्हान, वय 23 वर्ष, रा. नांदगाव पो.स्टे. कन्हान याने तिचे जवळ येवून 'तु मला ग्राम पंचायतचे नालीत कचरा टाकण्यास का मनाई करते' असे म्हणुन आरोपीने तिला हातबुक्कीने व फावडयाने मारून गंभीर जखमी केले. तिचा उपचारा दरम्यान मृत्यु झाला. आरोपीला दिनांक 21/04/2017 चे 11.52 वा. दरम्यान अटक करण्यात आली.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोलीस उपनिरीक्षक श्री. व्ही.एम.पोटे, पो.स्टे. कन्हान यांनी करुन सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिंनाक 10/01/2022 रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री. एस.बी. अग्रवाल, सत्र न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम 304 भादंवि. मध्ये 5 वर्ष सश्रम कारावास व 10,000/–रु. दंड व दंड न भरल्यास 2 महिने सश्रम कारावास, कलम 506 भादंवि मध्ये 6 महिने सश्रम कारावास व 1000/–रु. दंड व दंड न भरल्यास 15 दिवस सश्रम कारावास ची शिक्षा अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्रीमती. जी. एन. दुबे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन महिला सहायक पोलिस निरीक्षक शुभांगी वाजे तर कर्मचारी सहा.फौज. श्री. शंकरराव तराळे, श्री. सुनील डोंगरे, पोहवा श्री. मनोज तिवारी, मपोशि मृणाली चाके यांनी मदत केली आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर